दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | सोमवार | 2 फेब्रुवारी 2026 | अंक क्र. 256 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

बातम्या व जाहीरातीसाठी संपर्क 8421577797



# पशुसंवर्धन क्षेत्रात रोजगार व उद्योजकतेला चालना देणारा अर्थसंकल्प

## विकसित भारताच्या दिशेने महत्वाचे पाऊल ना. पंकजाताई मुंडे यांनी केले केंद्रीय अर्थसंकल्पाचे स्वागत

मुंबई | प्रतिनिधी

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला आजचा अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या दिशेने टाकलेले एक महत्वाचे पाऊल आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात कृषि व पशुसंवर्धन क्षेत्रासाठी करण्यात आलेल्या तरतुदी अत्यंत स्वागतार्ह असून या माध्यमातून ग्रामीण व निमशहरी भागात दर्जेदार रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळेल, अशी प्रतिक्रिया राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पाचे मंत्री पंकजाताई मुंडे यांनी स्वागत केले आहे. यावर प्रतिक्रिया देताना त्या म्हणाल्या, पशुसंवर्धन क्षेत्रासाठी जाहीर केलेल्या सवलती, नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय, प्रयोगशाळा यामुळे देशातील पशुपालकांना मोठा लाभ होणार आहे. याबद्दल मी देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे मी आभार मानते.

पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये अग्रस्थानी नेण्यासाठी हा अर्थसंकल्प महत्वाचा ठरणार आहे. महिला, वंचित घटका सह पायाभूत सुविधा, गुंतवणूक क्षेत्राला गती मिळणार आहे. हा अर्थसंकल्प भारताच्या वैश्विक स्थानाला मजबूत करणारा ठरेल. मेक इन इंडिया व आत्मनिर्भर भारतला नवी दिशा देणारा हा अर्थसंकल्प आहे.

अर्थसंकल्पामध्ये कृषी, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय क्षेत्राला दिलेल्या सवलती व सुविधामुळे गावातच रोजगाराच्या संधी मिळणार आहेत. पशुसंवर्धन क्षेत्रासाठी कर्ज-संलग्न अनुदान कार्यक्रम, पशुधन उद्योगांचे आधुनिकीकरण तसेच दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालनावर आधारित एकात्मिक मूल्य साखळ्यांच्या निर्मितीमुळे शेतकरी आणि युवकांसाठी उद्योजकतेच्या नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पशुधनाचा शेतीच्या एकूण उत्पन्नात सुमारे १६ टक्के वाटा असून, विशेषतः गरीब व अल्पभूधारक कुटुंबांच्या उत्पन्नात याचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. पशुवैद्यकीय व्यावसायिकांची संख्या २० हजारांपेक्षा अधिक वाढवण्याच्या दृष्टीने खाजगी क्षेत्रात पशुवैद्यकीय व सहायक पशुवैद्यकीय महाविद्यालये, रुग्णालये, निदान प्रयोगशाळा आणि प्रजनन सुविधांसाठी प्रस्तावित कर्ज-संलग्न भांडवली अनुदान योजना ही दीर्घकालीन दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची ठरेल, असेही त्या म्हणाल्या.

भारतीय आणि परदेशी संस्थांमधील सहकार्याला प्रोत्साहन देण्याच्या निर्णयामुळे आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि कौशल्य विकासाला गती मिळेल. या तरतुदींचा प्रभावी लाभ महाराष्ट्रातील पशुपालक, दुग्ध उत्पादक आणि कुक्कुटपालकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य शासन केंद्र सरकारच्या समन्वयाने आवश्यक पावले उचलणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# विकसित भारताच्या दिशेने भक्कम पाऊल टाकणारा अर्थसंकल्प : आ. सुरेश धस

आष्टी (प्रतिनिधी)

देशाला विकसित भारताच्या दिशेने वेगाने पुढे नेणारा हा अर्थसंकल्प दूरदृष्टीपूर्ण आणि सर्वसमावेशक असल्याचे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आहे. शहरीकरणाचे नियोजनबद्ध व्यवस्थापन, उद्योग व उद्योजकतेला चालना, तसेच गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीसाठी ठोस व प्रभावी उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत, असे ते म्हणाले.



पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी १२ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन क्षेत्राला दिलेला भर ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी ऊर्जा देणारा आहे. यामुळे शेतकरी, युवक आणि ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा लाभ होईल, असा विश्वास आ. धस यांनी व्यक्त केला.

लखपती दिदी योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी निर्माण करण्याचा निर्णय हा महिला सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृहांची सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय सामाजिकदृष्ट्या अत्यंत सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले.

आरोग्य क्षेत्रात जिल्हा रुग्णालयांमध्ये आपत्कालीन उपचार व्यवस्था सक्षम करण्याचा निर्णय सर्वसामान्य नागरिकांसाठी दिलासादायक ठरणार आहे. मुंबई–पुणे तसेच पुणे–हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे आर्थिक गती वाढून राज्याच्या जीडीपीत मोठी वाढ होईल, असेही त्यांनी नमूद केले.

प्रत्येक ग्रोथ हबसाठी पुढील पाच वर्षांत प्रत्येकी ५ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार असून त्याचा थेट लाभ मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर), पुणे महानगर आणि नागपूर महानगर ग्रोथ हबला होणार आहे. एकूणच हा अर्थसंकल्प विकास, रोजगारनिर्मिती आणि सामाजिक समतोल साधणारा असल्याचे आ. सुरेश धस यांनी स्पष्ट केले.

# स्टार प्रचारक ना. पंकजाताई मुंडे यांचा उद्यापासून जि. प. निवडणूक प्रचारार्थ झंझावाती दौरा

## 2 फेब्रुवारीला छत्रपती संभाजीनगर तर 3 तारखेला लातूर, सोलापूर जिल्ह्यात जाहीर सभा



मुंबई | प्रतिनिधी

राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी स्टार प्रचारक तथा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा उद्यापासून झंझावाती प्रचार दौरा सुरू होत आहे. उद्या २ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पाच तर 3 फेब्रुवारीला रोजी लातूर जिल्ह्यात तीन व सोलापूर जिल्ह्यात दोन जाहीर सभा त्या घेणार आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये अधिकाधिक भाजपाचे उमेदवार निवडून आणण्याच्या दृष्टीने ना. पंकजाताई मुंडे यांच्या जाहीर सभांना ठिकठिकाणी प्रचंड मागणी आहे. त्या अनुषंगाने पक्षाच्या वतीने ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रचार दौऱ्याचे नियोजन करण्यात आले आहे. 02 फेब्रुवारी रोजी सकाळी विमानाने छत्रपती संभाजीनगर येथे जाणार असून तिथून दुपारी हेलिकॉप्टरने जिल्ह्यातील विविध जि.प. गटांमध्ये पंकजाताई मुंडे यांच्या जाहीर सभा आयोजित करण्यात आल्या आहेत. 2 फेब्रुवारी रोजी दुपारी 12. वा पिशोर ता. कन्नड, दुपारी 01.30 वा घाटनांद्रा ता. सिल्लोड, दुपारी 03 वा. चौका, दुपारी 05 वा आडगाव बु. ता. फुलंब्री रात्रौ 07 वा बजाज नगर वाळुज ता. छत्रपती संभाजीनगर तर 03 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वा किनगाव ता. अहमदपूर जि.लातूर, दुपारी 12.30 वा कोळनूर ता.जळकोट, दुपारी 01.30 वा जानवळ ता. चाकूर तर सायं. 4.30 वा मंद्रुप ता.जि. सोलापूर, संध्या 06 वा कुंभारी ता.जि. सोलापूर याठिकाणी त्यांच्या सभा होणार आहेत अशी माहिती ना पंकजाताई मुंडे यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

# राजे संभाजी केसरी परभणी कुस्ती स्पर्धेत "महेश सोनवणे" यास सुवर्णपदक

सिरसाळा (प्रतिनिधी)

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्ताने राजे संभाजी तालिम व खा. मा. संजय (बंडू) जाधव मित्रमंडळाच्या वतीने परभणी येथे दि. २३ जानेवारी २०२६ रोजी वेगवेगळ्या गटातील "राजे संभाजी केसरी परभणी" कुस्ती स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते.

या परभणी केसरी कुस्ती स्पर्धेत श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालयाचा मल्ल महेश सोनवणे (बी ए तृतीय) या पैलवानाने आपल्या वजनी गटात प्रतिस्पर्धी पै. महादेव काळे या मल्लास एकतर्फी धुळ चारत सुवर्ण पदक पटकावून परभणी केसरी वर आपले नाव कोरले. त्याला बक्षीस म्हणून ५१०००/- रुपये रोख व चांदीची गदा देऊन सन्मानित करण्यात आले.

त्याच्या या यशा बद्दल संस्थाध्यक्ष मा. आ. व्यंकटराव कदम साहेब, उपाध्यक्ष श्री नंदकिशोर सारडा, सचिव योगेश भैय्या कदम, सर्व संचालक मंडळ, प्राचार्य डॉ के के पाटील, क्रीडा संचालक डॉ ए डी टेकाळे, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ विठ्ठल भोसले, महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



# वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहिर

## सिरसाळा सर्कल अध्यक्ष किरवले,शहराध्यक्ष गायकवाड तर उपाध्यक्ष पदी फुके

सिरसाळा | प्रतिनिधी

परळी तालुक्यातील सिरसाळा सर्कल व सिरसाळा शहर च्या वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकार्यांची निवड बीड जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे व परळी तालुकाध्यक्ष गौतम साळवे यांच्या उपस्थितीत करण्यात आली, सिरसाळ्यात वंचित बहुजन आघाडीची दिनांक १ फेब्रुवारी रोजी बैठक संपन्न झाली ह्या बैठकीत वंचित बहुजन आघाडीच्या सिरसाळा सर्कल अध्यक्ष पदी सर्कस अध्यक्ष- माधव भिमराव किरवले ,

शहर अध्यक्ष -आकाश भिमराव गायकवाड ,सर्कल उपाध्यक्ष - आशोक कचरुबा फुके यांची निवड करण्यात आली आहे. ह्या निवडी वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश महासचिव किसन चव्हाण, बीड जिल्हा पूर्व अध्यक्ष शैलेश भैया कांबळे यांच्या सूचनेनुसार व बीड जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे,परळी तालुकाध्यक्ष गौतम साळवे उप.अध्यक्ष विजय झिंजुर्डे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली, पदाधिकार्यांच्या निवडी करुन जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांनी पक्ष संघटन व पक्ष वाढीच्या दृष्टिकोनातून मोलाचे मार्गदर्शन केले. ते म्हणाले कि,सर्वसामान्य जनतेला न्याय,हक्क मिळून देण्याकरिता व अन्याय अत्याचार विरुद्ध वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ता लढला पाहिजे, श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर व पक्षाचे विचार गाव खेड्या पर्यंत पोहोचवण्याचे कार्य आपणास करायचे आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत मोठ्या ताकतीने आपण निवडणूक मैदानात उतरणार आहेत म्हणून कार्यकर्त्यांनी त्या दृष्टीने तयारी करावी,गावा गावात वंचित बहुजन आघाडीचा कार्यकर्ता निर्माण करावा . वंचित बहुजन आघाडीचा कार्यकर्ता सरंपच,जिल्हा परिषद सदस्य,पंचायत समिती सदस्य झाला पाहिजे आणि या साठी मोठ्या जोमाने काम करावे असेही मिलिंद घाडगे यांनी म्हटले आहे. या वेळी नवीन पदाधिकार्यांचा सत्कार करुन शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या,दरम्यान ह्या बैठकीस अमोल किरवले,संतोष किरवले,किशोर गायकवाड,घुमरे विनोद,बाळासाहेब किरवले,किरण किरवले , विजय पाटील,राजेभाऊ सूर्यवंशी,मुन्ना गायकवाड,आकाश किरवले,रवि काजळे,अजय गायकवाड आदी सह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.



# शिलाँग



भारताच्या पूर्वोत्तर राज्यामधील मेघालयची राजधानी असलेले शिलाँग हे ठिकाण देश विदेशातील पर्यटकांना पर्यटनाचा मनमुराद आनंद मिळवून देण्यासाठी प्रसिद्ध आहे. भारतीय संस्कृतीचे वेगळे दर्शन आणि भौगोलिक विविधता यांचे सुंदर दर्शन येथे घडते. बारमाही वाहणारे झरे, धबधबे, चोहोबाजूंना असलेली हिरवाई, दर्या, डोंगर आणि नाना प्रकारच्या जातींचे महाकाय वृक्ष, या वृक्षांच्या फांद्या आणि मुळांपासून बनविले गेलेले सुंदर पूल अशी भरपेट मेजवानी पर्यटकांना भुरळ घालत असते.

मेघालय याचा अर्थच आहे मेघांचे निवासस्थान. या भागात पाऊस खूप पडतो. शिलाँगवर ब्रिटीश वास्तू आणि खाद्यपेयांचा दाट पगडा आहे. पाहण्यासारखी अनेक सुंदर ठिकाणे असलेले या राज्यात प्रामुख्याने आदिवासी जमातींची वस्ती आहे. हत्तीचा भास होणारा आणि तीन टप्प्यात पाणी कोसळणारा हाथी झरना हे येथल्या आकर्षणातले मुख्य आकर्षण म्हटले पाहिजे. पाहाल तेथे निसर्गसौदर्याची रेलचेल असलेले शिलाँग नितांतसुंदर पण छोटेसे शहर आहे. येथून 8 किमीवर असलेला एलिफंटा फॉल पाहायलाच हवा. चेरापुंजी हे सर्वाधिक पावसाचे ठिकाण येथून 56 किमीवर आहे. सततच्या पावसामुळे दाट झाडी आणि अतिविशाल वृक्षांची येथे दाटीच असून त्यातील काही वृक्ष केवळ याच भागात आढळतात. या भागात या अतिविशाल वृक्षांची मुळे आणि फांद्या बांधून मोठमोठे पूल तयार केले गेले असून ते अतिशय मजबूत आहेत. एकावेळी 50 लोक या पुलांवरून सहज जाऊ शकतात.



डॉन बास्को सेंटर हे सांस्कृतिक संग्रहालय, शिलाँग पीक हा 1966 मीटर उंचीचा भाग, घोड्याच्या नालाचा आकार असलेले मानवनिर्मित वार्डस सरोवर, बोटॅनिकल गार्डन, स्प्रेड इगल फॉल हा रूंद धबधबा आणि अ्रनोखे व प्रेक्षणीय असे बटरफ्लाय संग्रहालय ही येथील आणखी काही आकर्षणे. हे संग्रहालय फुलपाखरांना समर्पित आहे.

### कसे जाल ?

शिलाँगला जाण्यासाठी गुवाहाटीपासून विमान, बस, टॅक्सी अशा सेवा उपलब्ध आहेत. मार्च- एप्रिल आणि आक्टोबर नोव्हेंबर हा काळ येथे भेट देण्यासाठी चांगला काळ आहे

# भरतपूर अभयारण्य



राजस्थानातील केवलादेव या नावाने ओळखले जात असलेल्या या जंगलाचे नामकरण आता भरतपूर असे केले गेले आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट असलेले हे अभयारण्य हजारो जातींच्या स्थलांतरीत पक्षांसाठी प्रसिद्ध आहे. प्रसिद्ध ब्रिटीश पक्षीतज्ज्ञ सर पीटर स्कॉट यांनी या अभयारण्याचे वर्णन जगातील सर्वात सुंदर पक्षी ठिकाण असे केले आहे. हे जंगल 250 वर्षांपासूनचे असून जंगलात असलेल्या शिवमंदिरावरून त्याला केवलादेव असे नाव पडले होते. हे शंकराचे एक नाव आहे. 10 मार्च 1982 या दिवशी त्याला राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा दिला गेला व 1985 साली ते जागतिक वारसा यादीत समाविष्ट केले गेले.

### पक्ष्यांचा स्वर्ग



नेहमी आढळणाऱ्या पक्ष्यांबरोबरच येथे बदके, ग्रेटर स्पॉटेड इगल्स ( गरूड ), इस्टर्न इंपिरियल ईगल्स, आढळतात तसेच नामशेष होऊ घातलेले सायबेरियन क्रेन यांचे हे ब्रिडींग ठिकाण आहे. त्याबरोबरच पेलिगन, रेड काईट, गिधाडे, मार्बल्ड टील, बैकल टील या पक्ष्यांचा हा स्वर्ग म्हणून ओळखला जातो. सस्तन प्राण्यांत लांडगे, तरस, नीलगाई, ठिपक्यांची हरणे आढळतात.

या जंगलाच पक्षी इतक्या प्रचंड संख्येने आहेत की 1938 साली तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड लिडिग्लो यांनी एकाच शिकारीत 4273 पक्षी मारले होते अशी कथा सांगतात. अभयारण्य घोषित होण्यापूर्वी हे जंगल भरतपूर च्या महाराजांचे शिकारस्थळ म्हणून ओळखले जात होते. या पक्षीजंगलाचे मुख्य आकर्षण आहेत सारस पक्षी. अभयारण्याची वेळ सूर्योदय ते सूर्यास्त अशी असली तरी पक्षी पाहायचे असतील तर अगदी पहाटेच म्हणजे सूर्योदयापूर्वीच येथे पाहोचायला हवे.

### जाण्यासाठी मार्ग

येथे जाण्यासाठी जवळचा विमानतळ जयपूर आणि दिल्ली आहेत. रेल्वेने भरतपूर स्टेशनला उतरता येते. हिवाळा येथील चांगला हंगाम. नोव्हेंबर ते मार्च या काळात येथे स्थलांतरीत पक्षी खूप मोठ्या संख्येने येतात.

# सांस्कृतिक खजिन्याचे कच्छ



देशामध्ये मोठ्या प्रमाणात पारंपरिक पर्यटन स्थळे आहेत. मात्र कच्छ हे आपल्या वेगळेपणामुळे आणि सौंदर्यामुळे तग धरून उभा आहे. हा देशातील सर्वात मोठा जिल्हा असल्याने एक भौगोलिक आश्चर्य तर आहेच पण येथे सांस्कृतिक खजिना दडलेला आहे. यामुळे पर्यटकांनी कोणताही विचार न करता याचा प्रवास सुरू करून सुंदर आठवणी घेऊन जावे.

### कच्छचे रण

कच्छचे रण वास्तव्यासाठी योग्य ठिकाण नसले तरीही पर्यटकांनी या ठिकाणाला नक्की भेट द्यावी. येथील क्षारयुक्त जमिनीवर जेथे दृष्टी जाईल तेथे दूरपर्यंत मैलोन मैल पांढरी रेती पसरलेली बघायला मिळते. तुम्ही त्याचे ते रुप डोळ्यात आणि कॅमेऱ्यात साठवून ठेवू शकता. तसेच दिवसा सूर्याच्या किरणांमध्ये न्हाऊन निघालेले लुकलुकणारे रेतीचे कण अनुभवता येतात आणि तर रात्री चंद्राचे आगमन झाल्यानंतर निळसर प्रकाशामध्ये न्हाऊन निघालेला हा प्रदेश थेट चित्रातून बाहेर उतरल्यासारखा भासतो.

### भूजमधील सहल

भूज कच्छची राजधानी आहे आणि हे शहर 16 व्या शतकातील एक संस्थानही होते. येथील विखुरलेल्या वैभवशाली आणि उत्तमरित्या जतन केलेल्या राजवाड्यांच्या स्वरुपातील या शहराचा राजेशाही थाट अजूनही पाहता येतो. यामध्ये सर्वोत्तम कल्पना म्हणून ताज महाल, आईना महल यांचा समावेश आहे.

### मांडवीमध्ये पक्षी निरीक्षण

मांडवी भारतातील जुन्या बंदरापैकी एक आहे आणि आज येथे अनेक पक्षी निरीक्षक मोठ्या प्रमाणात येतात. अक्षरशः वेड्यासारखे येथील अगणित प्रकारच्या पक्ष्यांचे सौंदर्य अनुभवतात. येथे पेलिकन्स, फ्लेमिंगो आणि अनोख्या प्रकारची बदके या सारख्या असंख्य पक्षांच्या प्रजातींचे थवे कोणत्याही पाणीसाठ्याजवळ आढळतात. मग ते तळे असो, दलदलीचा प्रदेश असो किंवा वाहणारे पाणी असो.



### कशी भेट द्याल ?

भूजमध्ये रेल्वे स्टेशन आणि विमानतळ आहे. तुम्ही मुंबई, अहमदाबाद, राजकोट, भावनगर या ठिकाणांपासून भूजसाठी बसेस घेऊ शकता.

# सैफ उल मलूक

### मे, जूनमध्ये जाणे उत्तम

या ठिकाणी जाण्यासाठी बाकी सोपस्कार करण्यापूर्वी हे लक्षात ठेवावे की मे जून हा येथे जाण्यासाठीचा सर्वात चांगला काळ आहे. थंडीत हे सरोवर बर्फाने गोठलेले असते त्यामुळे चहूबाजूला बर्फाशिवाय कांही दिसत नाही हे लक्षात ठेवून आपले प्रवासाचे शेड्यूल ठरवावे.

पाकिस्तानच्या खैबर जिल्ह्यातील सैफ उल मलूक सरोवर हे असेच भारतीय पर्यटकांचे आवडते पर्यटन स्थळ आहे. पशिर्यन युवराज सैफ उल मलूक यांच्या आठवणीत रमलेले हे स्थळ येथील अतिरम्य सरोवरासाठी आणि नितांतसुंदर निसर्गासाठी प्रसिद्ध आहे. या सरोवरात मिळणारे ब्राऊन ट्राऊट मासेही अतिशय प्रसिद्ध आहेत. सात किलो वजनाचे हे मासे पर्यटकांसाठी खास आकर्षण आहेत. आपल्या नंदनवनाची म्हणजे काश्मीरची आठवण करून देतील असे निळे बर्फाचे डोंगर, दूरवर पसरलेली हिरवाई, नितळ पाणी आणि स्वच्छ ताजी हवा तसेच मनाला निववणारी शांतता ही येथली खास वैशिष्ठये.

# पाकचे सुंदर सरोवर

पाकिस्तान म्हटले की शत्रू राष्ट्र असा भारतीयांचा समज होतो तसेच जगभरातील देशात पाकिस्तानची ओळख दहशतवादाला खतपाणी घालणारा देश अशी झाली आहे. मात्र हा देश अनेक नितांत सुंदर पर्यटनस्थळांनी परिपूर्ण असल्याची माहिती खूपच थोड्या लोकांना आहे. भारत पाक सीमेवरील तणाव हा नेहमीच धगधगता मुद्दा असला तरी आजही अनेक पाकिस्तानी भारतात पर्यटनासाठी येतात तसेच अनेक भारतीयही पाकमध्ये पर्यटनासाठी जात असतात.



# निसर्ग सौंदर्याने नटलेले अंदमान

बंगालच्या उपसागरात असलेली अंदमान आणि निकोबार ही बेटे भारताच्या मुख्य भूमीपासून दूर आहेत. या बेटांना आगळ्या-वेगळ्या संस्कृतीचे आणि अनोख्या निसर्ग सौंदर्याचे वलय लाभले आहे. सहलीला गेल्यावर नक्की पाहावा असा हा द्वीपसमूह आहे.

### नीरव शांततेसाठी

तुम्ही एखाद्या शांत जागेचा शोध घेत असाल तर अंदमान बेट एक उत्तम पर्याय आहे. उष्ण कटिबंधीय प्रदेशातील बंगालच्या खाडीजवळ हे बेट आहे पांढरे शुभ्र समुद्रकिनारे आणि हिरवेगार दाट जंगल हे अंदमानचे वैशिष्ट्य. निरनिराळे प्रकारचे प्राणी आणि वनस्पती यांच्या संचाराने या बेटाची शोभा अजूनच वाढते. साहसप्रेमी पर्यटकांसाठी स्कुबा ड्रायव्हींग, स्नॉरकेलिंग आणि मासे पकडण्यासाठी अंदमानचे समुद्र म्हणजे पर्वणीच.

उष्ण कटिबंधीय वनांनी युक्त घनदाट जंगले आणि लांबच लांब वाळूचे समुद्रतट असलेल्या प्रसिद्ध हॅवलॉक बेटाचा दौरा तर प्रत्येक पर्यटकाने करावा असाच आहे. हॅवलॉक, विजयनगर, राधानगर आणि एलिफंट समुद्रतट म्हणून प्रसिद्ध आहे. येथे तुम्ही स्कुबा डायविंग, स्नोर्कलिंग आणि मासेमारी करू शकता.

अंदमानची राजधानी पोर्ट ब्लेअर येथे एक ब्रिटीशकालीन ऐतिहासिक तुरुंग आजही भारतीय स्वातंत्र्यसैनिकांच्या आहूतीची साक्ष देत उभे आहे. आता त्याचे रुपांतर एका स्मारकात करण्यात आले आहे. निसर्गसंपन्नता आणि ऐतिहासिक वारसा या दोन्ही गोष्टी जर सोबतच अनुभवायच्या असतील तर याला भेट देणे योग्य ठरेल.

# आखाती देशातील ओमान



आखाती देशांकडे अनेकदा वेगळ्या नजरेने बघितले जाते. मग ते दुबईसारख्या देशातील सर्व सुविधांनी युक्त जीवनशैली असो किंवा सौदी अरेबियाचे प्रचंड वाळवंट. परंतु येथील ओमान हे एक विशेष स्थान लक्ष वेधून घेते ते त्याच्या अद्वितीय भूप्रदेश आणि संस्कृतीमुळेच. तुम्ही निश्चितपणे ओमानच्या प्रवासाची योजना का करावी हे जाणून घ्या...



### फ्रॅन्किसेन्स रोड

प्राचीन फ्रॅन्किसेन्स रोडवर सलालाहची घरे आहेत. शहराच्या कारावान मार्गावर या घरांची सुधारणा केली आहे. हे स्थान येथे आढळणाऱ्या सुवासिक राळसाठी प्रसिद्ध आहे. फ्रॅन्किसेन्स लॅण्ड संग्रहालयाला भेट द्या. जी ओमनच्या तेजस्वी आणि रंगीत इतिहासाला उज ळा देते. फ्रॅन्किसेन्सची झाडेही आपण येथे पाहू शकतो. येथे या स्फटीकांची चांगल्या दरामध्ये विक्री होते. शबा राणीच्या काळात याच्या विक्रीला सुरुवात केली होती.


### वाडीमध्ये क्षणभर विश्रांती

मस्कट-सूर महामार्गावर मध्य-पूर्वमध्ये एक नयनरम्य ड्राइव्ह आहे. अरेबिया गोड्या पाण्यातील तलाव आहे. हा जलस्त्रोत वाडीज म्हणून ओळखला जातो. ही उष्णता कमी करण्याची उत्तम जागा आहे. वाडीला सहसा वाळवंटात वाळूचा खडक व्यापलेला आहे. त्याच्या भव्य भिंती करून तलावाला घेरले जाते. मात्र ओमन वेशभूषांबाबतीत पुराणमतवादी आहे. यामुळे सभ्यतेबाबत कठोर मार्गदर्शक तत्वांची खात्री करून घ्या.

### रस-अल-जिंझ कासव केंद्र

रस-अल-जिंझ कासव केंद्रामध्ये ऑलिव्ह रिडले समुद्रातले आणि हिरव्या समुद्रातले दुर्मिळ प्रजातीचे कासव आढळण्याची उत्तम जागा आहे. टूर मार्गदर्शक आपल्याला प्राण्यांबद्दल माहिती देतो. तुम्ही रात्री उशिराची टूर घेतली तर वॉडलिंगसारखे वाळूमध्ये चटकन न आढळणारा प्राणी पाहू शकता.

# मन:शांतीची अनुभूती देणारी चामरलेणी



म्हसरूळ (नाशिक) येथील चामरलेणी (गजपंथ) जैनधर्मीयांचे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. देशभरातून भाविक व पर्यटक या क्षेत्राला वर्षभर भेट देतात. त्यावर एक दृष्टिक्षेप... म्हसरूळ येथील चामरलेणी (गजपंथ) हे दिगंबर जैन पंथीयांचे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र. ही लेणी केवळ ऐतिहासिक वा धार्मिकच नव्हे, तर अनोख्या निसर्गसौंदर्याचं शांतीसह अनुभूती देणारे सिद्धक्षेत्र बनले आहे. भाविक दूरवरून येथे येऊन आपले दोष, राग-द्वेष, वासना, अहंकार या सर्वांचाच या शांतिस्थळावर त्याग करतात. येथे प्रत्येक ऋतूत भाविकांची वर्दळ असते.

### शुभ्र लेण्यांचे दर्शन

म्हसरूळ गावापासून 4 किलोमीटरवरील निसर्गसौंदर्याने नटलेला पर्वत पांढऱ्या शुभ्र लेण्याला छातीवर घेऊन उभा असतो. हे दृश्य पाहून भाविक या पर्वताच्या प्रेमातच पडतो. उल्हसित मनाने वाटचाल करतो या शांतिस्थळाकडे. अशा उत्साहपूर्ण वातावरणात भाविकासमोर या पर्वताच्या पायथ्याशी असेलेले मंदिर येते. त्याच्या छोट्या गाभाऱ्यांत चारही दिशांना श्वेतवर्णाच्या पद्मासनातील मूर्ती आहेत. तेथेच दोन फूट उंचीची पार्श्वनाथांची श्वेतवर्ण पद्मासन प्रतिमा आहे. जवळच क्षेमेंद्रकीर्तींची समाधी आहे. या मंदिरातून बाहेर पडताच पर्वतावरील लेणी खुणावत असतात. हिरव्या रंगाचे प्रदर्शन करणारा हा पर्वत काळ्याशार दगडांची वाट अंगभर घेऊन छातीवरील लेण्यात येण्याचे जणू आव्हानच देत असतो.

### श्वेतवर्ण चरण

सृष्टीसौंदर्य न्याहळत सुमारे 435 पायऱ्या चढून जेव्हा यात्रेकरू या पर्वतावरील गुंफांत प्रवेश करतो तेव्हा त्याला प्रथम जाणवते ती विलक्षण निरव शांतता. सुरुवातीला उजव्या हाताला छोट्या शिखराखाली तीन श्वेतवर्ण चरण आहेत. ते सुदर्शन, नंदी आणि नंदीमित्र या बलभद्रांचे आहेत. शिखरावर सुव्रत, सुधर्म, गजकुमार, अचल आणि विजय या बलभद्रांचे चरण आहेत. त्यांच्याजवळच नव्यानेच उभारलेली दोन मंदिरे आहेत. एका गुंफेत भगवान पार्श्वनाथांची प्रतिमा आहे. ती उत्खननात मिळाली आहे. ती पूर्ण आणि अत्यंत मनोहरी श्यामवर्णीय मूर्ती नजर खिळवून ठेवते. ती दहा फूट चार इंच उंचीची पद्मासन प्रतिमा आहे. चारित्र्य चक्रवर्ती आचार्य शांतिसागरजींच्या मार्गदर्शनाखाली तिची स्थापना केली आहे.

### प्राचीन गुफा

मार्गशीर्ष शुक्ल 10, संवत 1664 मधील ही घटना आहे. दुसरे मंदिर वीर संवत 2460 मध्ये उभारले. उजव्या बाजूला एक फूट पाच इंच उंचीची कत्थई वर्णाची भगवान पद्मप्रभू यांची, तर डाव्या बाजूला भगवान वासुपूज्य यांची प्रतिमा आहे. या प्रतिमांशेजारीच तीर्थस्थळांवरील शांततेची अनोखी अनुभूती देणाऱ्या दोन प्राचीन गुंफा आहेत. त्या भाविकांना वेगळ्याच विश्वात घेऊन जातात. स्वत्व विसरायला लावतात. या गुफांचा इतिहास ज्ञात नाही. प्रतिमांना लेप लावलेला आहे. त्यामुळे त्यांची निर्मिती कोणत्या काळात झालेली आहे, याचे अनुमान निघत नाही. समोर वेदीवर एक शिलाफलकात तीन श्यामवर्णीय,चार फूट पाच इंच उंचीच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. प्रत्येक प्रतिमांच्या दोन्ही बाजूला स्तंभ आहेत. त्यावर सर्वांत वर पद्मासन, मध्ये जंजीर आणि खालच्या बाजूला खड्गासन प्रतिमा अंकित आहेत. प्रतिमांवर छत्र असून, त्याच्या दोन्ही बाजूंना तूर्यवाद्ये आहेत. या छत्रावर एका हातात चामर, तर दुसऱ्या हातात फळे घेतलेली देवी, तसेच त्याच्याहीवर किचक आहे. बाजूलाच भक्त हात जोडून बसला आहे. या गुंफांत पद्मासन आणि खड्गासनस्थ मूर्ती आहेत. या गुंफेतील बाहेरच्या कक्षात भिंतीतच साडेसहा

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापून मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# बजेट 2026–27 : महिलांसाठी पुन्हा अपेक्षाभंगाचेच!

डॉ. सुवर्णा कराड




केंद्रीय अर्थसंकल्प २०२६–२७ सादर झाल्यानंतर महिलांच्या दृष्टीने एक मूलभूत प्रश्न पुन्हा समोर येतो—हा अर्थसंकल्प खरोखर महिला-केंद्रित आहे का? सरकारकडून जेंडर बजेट वाढवण्यात आले आहे, महिलांसाठी काही योजना सुरू ठेवल्या आहेत आणि आकडेवारीच्या पातळीवर पाहिले तर प्रयत्न झाल्याचे चित्र दिसते; मात्र त्याच आकडेवारीचा सखोल विचार केला असता महिलांचे जीवन खऱ्या अर्थाने बदलणारी दिशा या बजेटमध्ये स्पष्टपणे दिसून येत नाही.

उपलब्ध माहितीनुसार, २०२५–२६ मध्ये जेंडर बजेट सुमारे ३७.५ टक्क्यांनी वाढून ₹४.४९ लाख कोटी इतके झाले आहे. हे जेंडर बजेट एकूण केंद्रीय खर्चाच्या सुमारे ८.९ टक्के आणि भारताच्या GDP च्या जवळपास १ टक्का इतके आहे. आकड्यांच्या दृष्टीने ही वाढ मोठी वाटते आणि प्रथमदर्शनी महिलांसाठी सरकार गंभीर आहे, असा संकेत मिळतो. मात्र याच ठिकाणी एक मूलभूत विसंगती जाणवते. भारतातील महिला लोकसंख्या सुमारे ४८ टक्के आहे, पण त्यांच्या नावावर थेट मोजला जाणारा बजेट वाटा ९ टक्क्यांपेक्षा कमी आहे. म्हणजेच लोकसंख्येच्या तुलनेत महिलांसाठीचा आर्थिक हस्तक्षेप अजूनही मर्यादित आहे.

या बजेटमध्ये पोषण, अंगणवाडी, मातृ-बाल आरोग्य, गर्भवती व स्तनदा मातांसाठी सेवा आणि स्वयं-सहायता गट यांसारख्या योजनांवर सरकारने सातत्य ठेवले आहे. महिला व बालविकास मंत्रालयाच्या एकूण खर्चापैकी ८० टक्क्यांहून अधिक निधी महिलाकेंद्रित योजनांवर खर्च केला जातो, हे निश्चितच स्वागतार्ह आहे. ग्रामीण, गरीब आणि वंचित महिलांसाठी या योजना उपयुक्त आहेत आणि त्यातून आरोग्य, पोषण व सामाजिक संरक्षणाच्या पातळीवर काही प्रमाणात दिलासा मिळतो. तसेच देशभरात सुमारे ९ कोटींहून अधिक महिला स्वयं-सहायता गटांशी जोडलेल्या असून, बचत, बँकिंग, कर्ज आणि छोट्या उद्योगांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक समावेशन वाढवण्याचा प्रयत्न सुरू आहे. महिला उद्योजकतेसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देणाऱ्या उपक्रमांची घोषणाही या बजेटमध्ये करण्यात आली आहे.

मात्र या सकारात्मक बाबी असूनही महिलांचे खरे प्रश्न आकडेवारीतून वेगळेच चित्र दाखवतात. महिलांचे GDP मधील थेट योगदान केवळ सुमारे १८ टक्के इतके नोंदवले जाते. याचा अर्थ महिलांचे काम कमी आहे, असा नाही; तर महिलांचे बहुतांश श्रम अवैतनिक आणि अदृश्य स्वरूपात असल्यामुळे ते अर्थव्यवस्थेच्या अधिकृत मोजमापात दिसत नाहीत. Time Use Survey नुसार महिला दररोज सरासरी ३६६ मिनिटे, म्हणजे सहा तासांपेक्षा अधिक वेळ घरकाम आणि काळजी (care work) यासाठी खर्च करतात, तर सशुल्क कामासाठी केवळ ७६ मिनिटे देतात. म्हणजे महिलांचे एकूण कामाचे तास वाढले आहेत, पण उत्पन्न, आर्थिक स्वायत्तता आणि निर्णयक्षमतेत त्या प्रमाणात वाढ झालेली नाही. हीच महिलांची "वेळेची गरिबी" आहे आणि हाच आजचा सर्वात मोठा महिला प्रश्न आहे.

या पार्श्वभूमीवर पाहिले तर अर्थसंकल्पात महिलांचा वेळ वाचवणाऱ्या केअर इन्फ्रास्ट्रक्चर—जसे की क्रेच सुविधा, वृद्ध काळजी सेवा, घराजवळ रोजगाराच्या संधी—यासाठी स्वतंत्र, ठोस तरतूद दिसून येत नाही. योजना वेगवेगळ्या आहेत, पण त्यांचा समन्वय नाही; त्यामुळे महिलांचा वेळ मोकळा होत नाही आणि त्यांच्या कामाचा ताण कायम राहतो. महिला रोजगाराच्या बाबतीतही आकडे स्पष्ट आहेत. भारतात महिला कामगार सहभाग दर अजूनही सुमारे २५ टक्क्यांच्या आसपास आहे. तरीही या बजेटमध्ये महिलांसाठी स्वतंत्र रोजगार धोरण, शहरी महिला रोजगार योजना किंवा खासगी क्षेत्राला महिलांना नोकरी देण्यासाठी कर-प्रोत्साहन यासारख्या ठोस घोषणा आढळत नाहीत. कौशल्यविकासाचा उल्लेख आहे, पण त्या कौशल्याला थेट नोकरीशी जोडणारी आर्थिक दिशा नाही.



डॉ. सुवर्णा कराड
प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ,
महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य

महिला सुरक्षिततेचा प्रश्नही या बजेटमध्ये ठोसपणे हाताळलेला दिसत नाही. निर्भया निधीचा उल्लेख असला तरी सुरक्षित सार्वजनिक वाहतूक, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता आणि जलद न्यायप्रक्रिया यासाठी नवीन व परिणामाधारित निधीची स्पष्ट घोषणा दिसून येत नाही. खर्च किती झाला यापेक्षा महिलांना प्रत्यक्ष किती सुरक्षित वाटते, हे मोजण्याची दिशा या बजेटमध्ये नाही. कृषी क्षेत्रातील महिलांची स्थितीही याच विसंगतीचे उदाहरण आहे. शेतीमध्ये महिलांचे योगदान मोठे असतानाही, जेंडर बजेटमधील केवळ सुमारे ४ टक्के निधी कृषी क्षेत्राकडे जातो. बहुतांश योजना जमीनधारकांवर आधारित असल्यामुळे महिला शेतमजूर आणि अवैतनिक काम करणाऱ्या महिलांना थेट लाभ मर्यादित राहतो.

एकूणच आकडे सांगतात की जेंडर बजेट वाढले आहे—₹४.४९ लाख कोटी, ३७.५ टक्के वाढ, एकूण बजेटचा ८.९ टक्के वाटा. पण तेच आकडे हेही सांगतात की महिला कामगार सहभाग फक्त २५ टक्के आहे, महिलांचा अवैतनिक कामावरचा वेळ दररोज ३६६ मिनिटे आहे आणि GDP मधील योगदान केवळ १८ टक्के मोजले जाते. त्यामुळे निष्कर्ष स्पष्ट आहे—हा अर्थसंकल्प महिलांचा विचार करतो, पण महिलांना केंद्रस्थानी ठेवत नाही असे म्हणावे असाच आहे.

# भारतीय परिचारिकांच्या मदतीसाठी 24 तास मोबाइल ॲप सुरु : अनिल जायभाये बीडकर

## "नर्सिंग ऑफिसर्स फाउंडेशन" महाराष्ट्र राज्य यांचा पुढाकार

(मुंबई वृत्तसंस्था)

"नर्सिंग ऑफिसर्स फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य" यांनी भारतीय नर्सिंग व्यावसायिकांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रांतिकारी पाऊल टाकत शैक्षणिक, सामाजिक, परिचर्या, रोजगार क्षेत्रात एकत्रित प्रयत्नांना चालना देण्यासाठी , नर्सिंग ऑफिसर्स यांचे प्रश्न देशपातळीवर सोडवण्यासाठी मोबाईल ॲप चे निर्माण करण्यात आले आहे.

२६ जानेवारी २०२६ प्रजासत्ताक दिनाच्या शुभ मुहूर्तावर "नर्सिंग ऑफिसर्स फाउंडेशन महाराष्ट्र राज्य" ने भारतीय परिचारिका बंधु भगिनींसाठी एक ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण उपक्रम राबवला असून फाउंडेशनने आपले अधिकृत मोबाइल ॲप अधिकृतरित्या लाँच केले असून, हे ॲप भारतातील,महाराष्ट्रातील हजारो नर्सिंग ऑफिसर्सना एक मजबूत, एकसंध आणि प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देणार आहे. या ॲप च्या माध्यमातून नर्सिंग व्यावसायिकांना शैक्षणिक विकास, व्यावसायिक कौशल्य वृद्धी, रोजगाराच्या संधी, न्यायिक लढे, सामाजिक कल्याण, राजकीय जागरूकता आणि हक्कांच्या रक्षणासाठी विविध सेवा-सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध केल्या आहेत हे ॲप संपुर्ण नर्सिंग समुदायाला एकत्र जोडण्याचे,आणण्याचे, त्यांच्या समस्या मांडण्याचे आणि सामूहिकरित्या त्यावर उपाययोजना करण्याचे एक शक्तिशाली प्रभावी साधन ठरणार आहे. फाउंडेशनची उद्दिष्टे आणि दूरदृष्टी

"नर्सिंग ऑफिसर्स फाउंडेशन महाराष्ट्र राज्य" ची संकल्पना अध्यक्ष श्री. मिलिंद मोटे सर यांच्या प्रेरणेने साकार झाली असून, फाउंडेशनची घटना प्रधान सचिव श्री. नागसेन भालेराव सर यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक तयार केली आहे. फाउंडेशनचे मुख्य उद्दिष्ट नर्सिंग व्यावसायिकांच्या सर्वांगीण विकासासोबतच त्यांच्या हक्कांचे संरक्षण, शिक्षणातील सुधारणा, देशी,परदेशी नोकरीच्या अनेकानेक संधी, सामाजिक प्रतिष्ठा वाढवणे आणि राजकीय स्तरावर प्रभावी सहभाग सुनिश्चित करणे हे आहे.

तसेच व्यावसायिक सल्लागार म्हणून श्री. निंगराज विंचुरे सर, कायदा तज्ज्ञ ॲड. रचना अग्रवाल मॅडम, सामाजिक व राजकीय सल्लागार श्री. प्रमोद दादा पाटील साहेब आणि क्रीडा सल्लागार श्री. विशाल वडतकर साहेब यांचा समावेश आहे.

### नियामक मंडळ आणि सल्लागार मंडळ

- फाउंडेशनच्या गव्हर्निंग बोर्डमध्ये खालील प्रमुख पदाधिकारी आणि सदस्यांचा समावेश आहे:
- अध्यक्ष – श्री. मिलिंद मोटे सर 80825 55896
- प्रधान सचिव – श्री. नागसेन भालेराव सर 77670 30080
- खजिनदार – श्री. अक्षय जाधव सर 96375 90545
- सोशल मीडिया प्रमुख – श्री. महेश पाडवी सर 80979 03619
- प्रवक्ता – श्री. कृणाल मलकापूरे सर 7875710508
- राज्य संघटक – श्री. पवन आटोळे सर 86059 38378

NURSING OFFICER'S FOUNDATION
MAHARASHTRA STATE

### ॲप च्या प्रमुख वैशिष्ट्यांचा समावेश

- शैक्षणिक अपडेट्स, प्रशिक्षण कार्यक्रम संधी
- देश विदेशात रोजगाराच्या संधी, जॉब अलर्ट आणि करिअर मार्गदर्शन
- व्यावसायिक विकासासाठी वर्कशॉप, सेमिनार आणि नेटवर्किंग
- न्यायिक मदत, कायदेशीर सल्ला आणि हक्कांच्या रक्षणासाठी सहाय्य
- सामाजिक कल्याण योजना, आरोग्य विमा आणि कुटुंब कल्याण कार्यक्रम
- राजकीय जागरूकता, निवडणूक मार्गदर्शन आणि नेतृत्व विकास

भारतीय नर्सिंग ऑफिसर्स ( स्टाफ )यांना फाउंडेशनचे प्रवक्ता श्री. कृणाल मलकापूरे सर यांनी आवाहन केले की प्रत्येक नर्सिंग ऑफिसरने या फाउंडेशनचे ॲप ताबडतोब डाउनलोड करून आपले प्रश्न प्राधान्याने सोडवून,एकत्र येऊन आपण नर्सिंग क्षेत्राला अधिक मजबूत, सन्मानित आणि व्यावसायिकदृष्ट्या समृद्ध बनवू शकतो हे ॲप फक्त तंत्रज्ञानाचे साधन नाही, तर आपल्या "समुदायाच्या एकजुटीचे आणि प्रगतीचे प्रतीक" आहे असे सांगितले आहे.

हे ॲप देशभरातील,राज्यभरातील नर्सिंग ऑफिसर्सना एकमेकांशी जोडण्यासोबतच त्यांच्या समस्या केंद्र आणि राज्य सरकारांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रभावी ठरेल, अशी अपेक्षा देशपातळीवरील, महाराष्ट्रपातळी वरील नर्सिंग क्षेत्रातील सर्व वरिष्ठ मान्यवरांनी व्यक्त केली आहे. "नर्सिंग ऑफिसर्स फाउंडेशन महाराष्ट्र राज्य" च्या या देशपातळीच्या आत्याधुनिक उपक्रमाने नर्सिंग समुदायासाठी एक नवीन अध्याय सुरू केला आहे. 26 जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या शुभ मुहूर्तावर या ऐतिहासिक प्रसंगी प्रसारित झालेल्या या ॲप मुळे नर्सिंग व्यावसायिकांच्या हक्क, प्रतिष्ठा आणि विकासासाठी नवीन ऊर्जा प्राप्त होईल जे फाउंडेशन सोबत सक्रीय होऊन नर्सिंग प्रोफेशनसाठी योगदान देऊ इच्छितात त्यांनी फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांना संपर्क साधावा लवकरच जिल्हास्तर आणि विभागीय स्तरावरील पदाधिकाऱ्यांचे निवडी जाहीर करण्यात येणार आहेत फाउंडेशनला सर्व स्तरांतून उत्स्फूर्त सहकार्य आणि शुभेच्छा दिल्या जात आहेत अशी माहिती अनिल जायभाये बीडकर यांनी दिली.

# सौ.अर्चना मधुकर गित्ते यांचे संशोधन क्षेत्रात घवघवीत यश; आंतरराष्ट्रीय पातळीवर डिझाइन नोंदणी यशस्वी

परळी वैजनाथ | प्रतिनिधी



परळी वैजनाथ येथील संशोधक सौ. अर्चना मधुकर गित्ते यांच्या संकल्पनेच्या डिझाइनला युनायटेड किंगडम इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी ऑफिस (UK IPO) कडून अधिकृत डिझाइन नोंदणी (Registered Design) प्राप्त झाली आहे.

याबाबतचे डिझाईन नोंदणी प्रमाणपत्र त्यांना नुकतेच प्रदान करण्यात आले आहे. हे डिझाइन आंतरराष्ट्रीय डिझाइन वर्गीकरणांतर्गत नोंदणीकृत झाले आहे. सखोल अभ्यास, प्रयोग आणि तांत्रिक विश्लेषणातून विकसित झालेल्या या संकल्पनेमुळे मत्स्यपालन क्षेत्रातील स्वयंचलित खाद्य व्यवस्थापनास चालना मिळणार आहे. शैक्षणिक संशोधन केवळ प्रबंधापुरते मर्यादित न राहता त्याचे बौद्धिक संपदा हक्कांमध्ये (Intellectual Property Rights) रूपांतर होऊ शकते, याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे.या यशामुळे विद्यापीठीय संशोधन, नवोन्मेष आणि उद्योगाभिमुख अभ्यास यांतील दुवा अधिक मजबूत होत असून, पीएचडी विद्यार्थ्यांसाठी संशोधनाचे व्यावहारिक व जागतिक मूल्य अधोरेखित झाले आहे. शिक्षण क्षेत्रातून संशोधन व नवकल्पनांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण होऊ शकते, याची ही प्रेरणादायी बाब मानली जात आहे. या यशस्वी वाटचालीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे .

# विष्णुअप्पा वामनअप्पा जुजगर यांचे अल्पशा आजाराने निधन पत्रकार संतोष जुजगर यांना पितृशोक

परळी वैजनाथ/ प्रतिनिधी



परळी वैजनाथ येथील रहिवासी, सामाजिक धार्मिक कार्यात सक्रिय कार्यकरत होते विष्णुअप्पा वामनअप्पा जुजगर (वय ७८) यांचे अंबाजोगाई येथे अल्पशा आजाराने आज रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता दुःखद निधन झाले.

त्यांचा अंत्यविधी आज रविवार दिनांक १ फेब्रुवारी रोजी दुपारी ठीक २.०० वाजता अंबाजोगाई येथे करण्यात आला. तसेच राख साठवण्याचा विधी मंगळवार, दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी 7.00 वाजता बोरुळ तलाव अंबाजोगाई येथे होणार आहे.

स्व. विष्णुअप्पा जुजगर हे समाजहिताची जाण ठेवणारे, धार्मिक उपक्रमात सक्रिय सहभाग घेणारे व सर्वसामान्यांशी आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले — वामन (दादा) जुजगर व पत्रकार संतोष जुजगर, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते पत्रकार संतोष जुजगर यांचे वडील होत.

# रोहित शेट्टी यांच्या घराबाहेर गोळीबार; बिश्नोई गँगची जबाबदारी स्वीकारल्याचा दावा, पुण्यातून पाच जण ताब्यात

मुंबई – वृत्तसंस्था

चित्रपट दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्या जुहू येथील निवासस्थानाबाहेर झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर तपासाला वेग आला असून या प्रकरणात धक्कादायक बाबी समोर येत आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून लॉरेन्स बिश्नोई गँगशी संबंधित असल्याचा दावा करणाऱ्यांनी हल्ल्याची जबाबदारी स्वीकारल्याचे समोर आले आहे. दरम्यान, मुंबई पोलिसांनी पुण्यात छापे टाकत पाच संशयितांना ताब्यात घेतले आहे.

गोळीबारानंतर काही तासांतच सोशल मीडियावर 'अर्जू बिश्नोई' नावाच्या व्यक्तीचा कथित ऑडिओ संदेश व्हायरल झाला. या संदेशात शुभम लोणकर आणि हरी बॉक्सर यांचा उल्लेख करत हा हल्ला त्यांच्या सांगण्यावरून केल्याचा दावा करण्यात आला आहे. पोलिसांकडून या ऑडिओची सत्यता तपासली जात असून त्याचा तपासात महत्त्वाचा धागा म्हणून विचार केला जात आहे.

**धमकीचा सूर, 'ट्रेलर'ची भाषा**

व्हायरल संदेशात या गोळीबाराला केवळ "शॉर्ट ट्रेलर" असे संबोधत मोठ्या संकटाची सुरुवात असल्याचा इशारा देण्यात आला आहे. रोहित शेट्टी यांनी कथितपणे गँगच्या कामात हस्तक्षेप करू नये, अशी पूर्वी चेतावणी देण्यात आली होती, असा दावा संदेशात करण्यात आला आहे. तसेच चित्रपटसृष्टीतील इतरांनाही अप्रत्यक्ष धमकी देण्यात आली आहे. या धमकींचा पोलिसांनी गांभीर्याने घेत तपासाचा फोकस संघटित गुन्हेगारीकडे वळवला आहे.

**पुणे कनेक्शन उघड**

मुंबई पोलिसांच्या विशेष पथकाने गुप्त माहिती आणि तांत्रिक निगराणीच्या आधारे पुण्यात कारवाई करत पाच संशयितांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्यांमध्ये अमन आनंद मराठे, आदित्य ज्ञानेश्वर सिंगिंग, सिद्धार्थ दीपक येनपुरे आणि समर्थ शिवशरण पोमाजी यांचा समावेश असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पाचव्या संशयिताची ओळख तपासाच्या कारणास्तव जाहीर करण्यात आलेली नाही.







प्राथमिक तपासानुसार हे संशयित बिश्नोई गँग आणि मुंबईतील स्थानिक गुन्हेगारी नेटवर्क यांच्यात दुवा म्हणून काम करत होते, अशी शक्यता तपासली जात आहे. घटनेनंतर हे आरोपी शहर सोडण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाल्याने सीसीटीव्ही फुटेज, कॉल डिटेल्स आणि मोबाइल लोकेशनच्या आधारे त्यांना ताब्यात घेण्यात आले.

**सुरक्षा वाढवली**

घटनेनंतर रोहित शेट्टी यांच्या घराबाहेर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्यांच्या वैयक्तिक सुरक्षेतही वाढ करण्यात आली असून परिसरात गस्त वाढवण्यात आली आहे. या प्रकरणात सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या दाव्यांची सत्यता, आर्थिक व्यवहार, स्थानिक सहकारी आणि हल्ल्यामागील नेमका हेतू या सर्व बाबींचा तपास विविध यंत्रणांकडून सुरू आहे. मुंबई पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# कांदा उत्पादक शेतकरी संकटात! उत्पादन खर्चही निघेना; दरात मोठी घसरण

## शेतातून मार्केटपर्यंत कांदा नेण्याचा खर्चही शेतकऱ्यांना भरावा लागत आहे

**संतोष सानप | आष्टी**

महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या कांद्याने यावर्षी डोळ्यात पाणी आणले आहे. नवीन वर्ष २०२६ मध्ये कांद्याला चांगले दर मिळतील, अशी आशा बाळगून असलेल्या शेतकऱ्यांचा पूर्णपणे भ्रमनिरास झाला आहे. जानेवारी महिन्याच्या सुरुवातीपासूनच कोसळलेले कांद्याचे दर महिनाअखेरपर्यंत सावरू शकलेले नाहीत. आज, ३१ जानेवारी रोजी कांद्याच्या दरात पुन्हा ५ ते ७ रुपयांची मोठी घसरण झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

गेल्या वर्षीच्या हंगामाच्या तुलनेत यावर्षीच्या हंगामात शेतकऱ्यांना कांदा उत्पादनासाठी लागणारा खर्च हा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. कांदा लागवडीपासून ते मार्केटपर्यंत माल पोहोचवण्यापर्यंतचा खर्च आवाक्याबाहेर गेला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी महागाईने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. गेल्या वर्षी ३०-३५ रुपयांना मिळणारी कांदा भरण्याची गोणी यावर्षी ५०-५५ रुपयांवर पोहोचली आहे. कांदा लागवडीचा दरही यावर्षी १५ हजार रुपये प्रति एकर इतका झाला आहे.

मजुरीच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. महिला मजुराचा दर ३०० वरून ३५० रुपये, तर पुरुष मजुराची मजुरी ६०० रुपये प्रतिदिन झाली आहे. सध्या बाजार समित्यांमध्ये कांद्याला सरासरी केवळ ११ ते १२ रुपये प्रति किलो इतका भाव मिळत आहे. एका बाजूला उत्पादन खर्चात झालेली भरमसाठ वाढ आणि दुसऱ्या बाजूला कोसळलेले बाजारभाव यामुळे शेतकऱ्यांना आपला मूळ खर्च काढणेही कठीण झाले आहे. कांदा लागवड, खते, औषधे आणि मजुरी यांचा हिशोब केला तर सध्या मिळणारा भाव हा जखमेवर मीठ चोळण्यासारखा आहे. शेतातून मार्केटपर्यंत कांदा नेण्याचा खर्चही खिशातून भरावा लागत आहे. फेब्रुवारी महिन्यात दरामध्ये सुधारणा होईल की, ही घसरण अशीच सुरू राहील, याकडे आता राज्यातील तमाम कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### कांदा विकावा की शेतात टाकून द्यावा

**उत्पादन खर्च, काढणी, वर्गीकरण, पॅकिंग आणि बाजार समितीपर्यंत वाहतूक यांचा एकत्रित हिशोब करता "कांदा विकावा की शेतात टाकून द्यावा, असा प्रश्न निर्माण झाला आहे," अशी हतबल प्रतिक्रिया शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.**



# कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्राला बळकटी देणारा ; विकसित भारताचा अर्थसंकल्प : आ. कराड

**लातूर | प्रतिनिधी**

शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय, आरोग्य, उद्योग आणि सिंचन सारख्या महत्त्वाच्या विभागाला भरीव तरतूद करणारा आणि दिव्यांग, महिलांसह सर्वच क्षेत्रातील घटकांना प्रोत्साहन देणारा विकसित भारत देशाचा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी व्यक्त केली आहे. देशाचे यशस्वी पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या मंत्रिमंडळातील अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सलग नवव्यांदा १ फेब्रुवारी २०२६ रोजी संसदेच्या सभागृहात अर्थसंकल्प सादर केला आहे.



या अर्थसंकल्पाबाबत बोलताना आ. रमेशआप्पा कराड यांनी सांगितले की, कर पद्धतीबाबत संपूर्ण देशभराचे लक्ष असलेल्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री सिताराम यांनी इनकम टॅक्स रिटर्न फॉर्म अधिक सोपा केला आहे. १ एप्रिल २०२६ पासून नवा उत्पन्नकर कायदा लागू होणार आहे. नव्या कायद्यानुसार तांत्रिक त्रुटींसाठी शिक्षा न देता दंड आकारला जाणार आहे. पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत प्रवासी प्रणालींना प्रोत्साहन देण्यासाठी देशातील महत्त्वाच्या शहरांमध्ये हाय-स्पीड रेल्वे कॉरिडोर विकसित करणार असून त्यात मुंबई ते पुणे, पुणे ते हैदराबाद यासह सात रेल्वेची घोषणा केली आहे.

दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालन अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न असून कृषी क्षेत्रातून अधिक उत्पादन मिळू शकेल. कृषी उत्पादनांमध्ये विविधता वाढवणे आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे हे उद्दिष्ट आहे असे सांगून निर्मला सीताराम यांनी कॅन्सरसाठीच्या १७ औषधांवरील आयात कर घटवला, ७ गंभीर - दुर्मिळ आजारांसाठीच्या औषधांवरील करात घट, चामडं आणि कापड उद्योगावरील निर्यात शुल्कात कपात. सौरऊर्जा उपकरणं स्वस्त होणार आहेत. १५ हजार माध्यमिक शाळांमध्ये कंटेंट क्रिएटर लॅब स्थापन केल्या जातील, लखपती दिदी योजना यशस्वी ठरल्याने महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी निर्माण करणारी महत्त्वाची योजना घोषित केली असून शिक्षण आणि उच्चशिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी देशातील प्रत्येक जिल्ह्यात वस्तीगृहांची घोषणा केली आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या कल्पनेतला विकसित भारत साकार करण्यासाठी अर्थसंकल्पात महत्वपूर्ण तरतुदी केल्या आहेत. यातून निश्चितपणे देशवासीयांचे जीवनमान उंचावेल अशी प्रतिक्रिया लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी व्यक्त केली.

# इस्रोच्या अभ्यास दौऱ्यासाठी सखारामजी नाईक महाविद्यालयाची विद्यार्थिनी समीक्षा यल्लावाड हिची निवड

**परळी (प्रतिनिधी )**

परळी तालुक्यातील वसंतनगरच्या उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी समीक्षा राजकुमार यल्लावाड हिची महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निवड परीक्षेत यश संपादन केल्यामुळे तिची इस्रो (भारतीय अंतराळ संशोधन संस्था) अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. या अभ्यास दौऱ्यासाठी संपूर्ण राज्यातून केवळ १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये परळीतील समीक्षा राजकुमार यल्लावाड हिचा समावेश झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

समीक्षा यल्लावाड ही उच्च माध्यमिक आश्रम शाळा, वसंतनगर येथे शिक्षण घेत आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष संजयजी राठोड, सचिव रामेश्वर राठोड,महाविद्यालयाचे प्राचार्य अरुण पवार, माजी सरपंच डी एस राठोड,



सरपंच विजय राठोड

याबरोबरच प्रा.नागरगोजे सर, प्रा.देशमुख सर, प्रा.सुरनर सर, प्रा. परळीकर, प्रा.आगरे, प्रा.जाधव,सर प्रा. मोरे सर, स्वामी सर, गीते सर,राम राठोड सर ( प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक) कै.लक्ष्मीबाई देशमुख शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संजयजी देशमुख, सचिव रवींद्रजी देशमुख, कोषाध्यक्ष प्रसादजी देशमुख, प्राचार्य डॉ. विद्या देशपांडे, तसेच दोन्ही महाविद्यालयांतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, मित्रपरिवार व पालकांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या राज्यस्तरीय परीक्षेत विज्ञान, तंत्रज्ञान, सामान्यज्ञान, तार्किक क्षमता व बौद्धिक कौशल्यावर आधारित प्रश्नांचा समावेश होता. या कठीण परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करत समीक्षा यल्लावाड हिने आपली गुणवत्ता सिद्ध केली. इस्रोच्या अभ्यास दौऱ्यात विद्यार्थ्यांना उपग्रह तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, रॉकेट प्रक्षेपण प्रक्रिया तसेच वैज्ञानिक प्रयोगशाळांची प्रत्यक्ष माहिती मिळणार आहे.

या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले असून, भविष्यात अंतराळ विज्ञान क्षेत्रात कार्य करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना नवी दिशा मिळाली आहे. समीक्षा यल्लावाड हिच्या पुढील शैक्षणिक व वैज्ञानिक वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# एकुर्गा गटात परिवर्तन घडवा; विकासकामांची हमी : आ. रमेशआप्पा कराड

**लातूर | प्रतिनिधी**

"एकुर्गा भागातून निवडून गेलेल्या काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी सातत्याने विकासाकडे दुर्लक्ष केले. या निष्क्रियतेला मतपेटीतून उत्तर देत एकुर्गा जिल्हा परिषद गटात परिवर्तन घडवा. केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून विकासाचे एकही काम प्रलंबित राहू देणार नाही," अशी ग्वाही भाजपाचे नेते आमदार रमेशआप्पा कराड यांनी दिली.

एकुर्गा जिल्हा परिषद गटातील भाजपाचे उमेदवार साहेबराव मुळे, एकुर्गा पंचायत समिती गणातील उमेदवार सौ. स्वाती किशोर घुटे तसेच अंकोली पंचायत समिती गणातील उमेदवार संजयबप्पा श्रीमंत सूर्यवंशी यांच्या प्रचारार्थ आ. कराड यांनी शनिवारी एकुर्गा, सावरगाव आणि चिंचोलीराव येथे मतदार बैठका घेतल्या. या वेळी तिन्ही उमेदवारांसह भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, दिनकरराव इंगळे, राजाभाऊ मुळे, धनराज शिंदे, आनंद पाटील, पांडुरंग गडदे, हनुमंत कतलाकुटे, बालाजी अडसूळ, बालासाहेब पाटील, किरण मुंडे, लक्ष्मीकांत घुटे, दत्ता सपकाळ, अनुसया पिंप्रे, गोवर्धन गवळी, रियाज पटेल, भारत आडसुळे, गोपाळ पांचाळ, अरुण शिंदे, विठ्ठल शिंदे आदी उपस्थित होते. बैठकींना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी बोलताना आ. कराड यांनी काँग्रेसवर टीका करत, "सत्तेत असताना विकासाऐवजी भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्यात आले. पंधरा वर्षांत किती निधी आणला आणि कोणत्या योजना राबवल्या, याचा हिशेब जनतेसमोर द्यावा," असे आव्हान दिले. "मी आमदार झाल्यापासून मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर निधी आणून विकासकामांना गती दिली," असेही ते म्हणाले. पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ग्रामीण भागातील प्रश्नांची जाण असलेले उमेदवार भाजपाने दिले असून ते जनतेची सेवा करणारे आहेत, तर विरोधकांचे उमेदवार केवळ राजकीय प्रतिष्ठेसाठी निवडणूक लढवत असल्याचा आरोपही त्यांनी केला. साहेबराव मुळे यांनी संजय गांधी निराधार योजनेतून हजारो गरजू लाभार्थ्यांना मदत मिळवून दिल्याचे सांगण्यात आले. बळीराजा शेतकरी पांदन रस्ता योजनेद्वारे पुढील दोन वर्षांत शेतरस्त्यांचे प्रश्न मार्गी लावण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या कबाला प्रश्नाच्या सोडवणुकीची प्रक्रिया सुरू असल्याचेही कराड यांनी नमूद केले.

लाडकी बहीण, शेतकरी सन्मान यांसारख्या योजना कायम ठेवण्यासाठी तसेच ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी कमळ चिन्हासमोरील बटन दाबून सर्व भाजप उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन आ. कराड यांनी केले.

या प्रचार बैठकींना विश्वंभर गवळी, विकास जाधव, नामदेव कांबळे, बाबासाहेब गवळी, खाज मिया पटेल, अमर पिंप्रे, सागर बोयणे, किरण चोपडे, सुधाकर केशवे, राजू गवळी, बब्रुवान केशवे, काशिनाथ अडसूळ, सुधाकर शिंदे, महादेव माने, सुरज सय्यद, धनराज फुलबोने, सुधाकर मोटे, भिकाजी घोडके, प्रवीण लोखंडे, शिवाजी जाधव, शालिकराव जाधव, सुभाष गिराम, नामदेव बचाटे, राजेंद्र गाडे, महादेव घुटे, नामदेव ननवरे, संभाजी नागटिळक, सुनील पाटील, बालासाहेब नागटिळक यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिरसाळा ग्रामपंचायत पोटनिवडणुकीचा बिगुल वाजला; 'नसीब' यांचे राजकीय नशीब उजळणार?

सिरसाळा/अतुल बडे

राज्यातील विविध कारणांमुळे रिक्त झालेल्या ग्रामपंचायत जागांसाठी राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यामध्ये परळी तालुक्यातील सिरसाळा ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या पोटनिवडणुकीचा मार्ग मोकळा झाला असून, गावात राजकीय हालचालींना वेग आला आहे. या निवडणुकीत स्थानिक सामाजिक कार्यकर्ते 'नसीब' यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू असून, त्यांचे 'नशीब' फळफळणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, सदस्य किंवा थेट सरपंच पदे निधन, राजीनामा अथवा अपात्रतेमुळे रिक्त झाली आहेत, तिथे पोटनिवडणुका घेतल्या जाणार आहेत. सिरसाळा येथे सरपंच पद रिक्त असल्याने प्रशासकीय पातळीवर मतदार यादी अद्ययावत करण्याचे काम सुरू झाले आहे. यात मतदार यादी दुरुस्ती आणि हरकतींची प्रक्रिया. अंतिम मतदार यादीची प्रसिद्धी. प्रशासनाकडून आयोगाकडे रिक्त पदांचा अहवाल सादर करणे.

प्राथमिक मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर हरकतींचा सोपस्कार पूर्ण होईल. त्यानंतर राज्य निवडणूक आयोग प्रत्यक्ष मतदानाचा अधिकृत कार्यक्रम जाहीर करेल. सिरसाळ्याचे सरपंच पद कोणाच्या पदरात पडते आणि नसीब यांचे राजकीय नशीब खरोखरच खुलते का, हे येणारा काळच ठरवेल.

### गावात राजकीय वातावरण तापले

**निवडणुकीची चाहुल लागताच सिरसाळ्यातील गटातटाच्या राजकारणात चैतन्य आले आहे. चौकाचौकात होणाऱ्या चर्चा, गुप्त बैठका आणि गाठीभेटींचे सत्र वाढले आहे. मतदार यादीच्या प्रक्रियेसोबतच इच्छुकांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली असून, यावेळी गावकरी नव्या नेतृत्वाच्या शोधात असल्याचे चित्र दिसत आहे.**

### 'नसीब' यांच्या नावाची चर्चा का?

**या पोटनिवडणुकीत नसीब नावाच्या स्थानिक तरुणाचे नाव केंद्रस्थानी आहे. त्यांच्या सामाजिक कामांमधील सक्रियता आणि युवकांमध्ये असलेला मोठा जनसंपर्क यामुळे त्यांच्या बाजूने कौल वाढताना दिसत आहे. "गावच्या विकासासाठी नवा चेहरा हवा," अशी भूमिका अनेक ग्रामस्थ मांडत असल्याने नसीब यांच्यासाठी ही निवडणूक मोठी संधी ठरू शकते.**

